-: प्रेस नोट :-                    दि. ०३/११/२०२३

# विविध बॅक तसेच फायनान्स कंपन्यांची बनावट कागदपत्रांचे आधारे फसवणुक करणाऱ्या आरोपीतास अटक करुन त्याचेकडुन २३ वाहने जप्त

तक्रारदार हे के.जे.एम.सी. या नॉन बँकीग फायनान्शीयल कंपनी ॲटलांटा, नरीमन पॉईट, मुंबई मध्ये कंपनी सेक्रेटरी ॲण्ड कंम्पालयन्स ऑफीसर म्हणुन काम करतात. त्यांचे कंपनीचे एरिया सेल्स मॅनेजर हे बाजारातील दुचाकी वाहन विक्रेते यांच्याशी संपर्कात राहतात. सेल्स एक्झिक्युटिव्ह हे ग्राहक कर्ज परतफेड करण्यास लायक आहेत किंवा कसे या बाबत क्रेडिट हेड डिपार्टमेंट कडून सिबील स्कोरची तपासणी करुन घेतात . त्यानंतर ग्राहकाचे कस्टमर लोन ॲग्रीमेंट भरुन त्यावर स्वाक्षऱ्या घेऊन आवश्यक कागदपत्रे उदा.- आधारकार्ड, पॅनकार्ड, विज बिल, राहत्या घरासंबंधाने कागदपत्रे, तीन पीडिसी धनादेश, ईएमआय वळते करुन घेण्या संदर्भाने बँकेचा नॅचफॉम इत्यादी एकत्रित करुन ती कागदपत्रे कंपनीकडे पाठवितात. पडताळणी होवुन संबधीत वाहन विक्रेते डिलरचे/मुख्य डिलरच्या बॅक खात्यावर मंजुर झालेली कर्जाची रक्कम तक्रारदार कंपनीकडून जमा केली जाते. नमूद व्यवहार झाल्यानंतर वाहन विक्रेते डिलरकडून त्या ग्राहकाला त्याने केलेल्या मागणीप्रमाणे ते वाहन देतात. त्या दरम्यान डिलरकडून कागदपत्रे संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात पाठविली जातात. संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून अर्जदाराच्या कंपनीचे हायपोथिकेशन नोंद होउन ते आर.सी.बुक ग्राहकाला मिळते. काही महीन्यानंतर बँकेच्या नॅचफॉमचे आधारे ईएमआय परस्पर अर्जदाराच्या कंपनीचे खात्यावर वळते होतात.

नमूद प्रकरणामध्ये स्कूटी पॉईट नावाच्या डिलरकडे फेब्रुवारी २०२० मध्ये मोहित वालेकर हे नाव धारण करणा-या इसमाने होंडा ॲक्टीव्हा ५ जी हे दुचाकी वाहन खरेदी संबंधाने आधारकार्ड, पॅनकार्ड, विज बिल, राहत्या घरासंबंधाने कागदपत्रे, तीन पीडिसी धनादेश, ईएमआय वळते करुन घेण्यासंदर्भाने बँकेचा नॅच फॉम इत्यादी एकत्रित करुन कागदपत्र दिली होती. पडताळणी होवुन मोहित वालेकर यांना तक्रारदार यांचे कंपनीने वाहन खरेदी करीता कर्ज मंजूर केले. त्यानुसार मोहित वालेकर याने त्यास हवे असलेले होंडा ॲक्टीव्हा ५ जी हे दुचाकी वाहन करीता डाऊन पेमेंट म्हणुन रु.१०,०००/- रोख रक्कम डिलर कडे जमा केली व वाहन खरेदी करणारा ग्राहक कर्जदार नामे मोहित वालेकर याने मागणी केलेली मंजूर कर्जाची रक्कम मुख्य डिलर शरयू मोटर्स यांचे आयसीआयसीआय बॅक, पनवेल शाखा, खाते मध्ये रु.६६,०५१/- इतकी रक्कम अर्जदार कंपनीकडून वळती करण्यात येवुन मोहित वालेकर यास त्याचे मागणीप्रमाणे मंजूर झालेले दुचाकी वाहन ताब्यात दिले. तसेच संबधीत मोटर परिवहन प्राधीकरण याचेकडे पाठविलेल्या कागदपत्रांच्या आधारे सदर वाहनाला एम.एच.४६ बीएक्स ०९३५ असा क्रमांक मिळाला. काही महिन्यानंतर जेव्हा नॅच फॉमव्दारे अर्जदार कंपनीला वर नमुद वाहनाचे ईएमआय न मिळाल्याने कंपनीचे श्री.महाजन हे मोहित वालेकर याचे करारनामावर नमुद पत्ता- फ्लॅट नं.१२०४, जय गणेश गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ३५१, नवी मुंबई येथे जाऊन पडताळणी केली असता सदरचा फ्लॅट बंद मिळून आला.२) फ्लॅट नं. ९०१, माऊली कृपा, सेक्टर १८, प्लॉट नं.३४, खारघर, पनवेल, जि.रायगड ४१०२१० येथे जावून पडताळणी केली असता सदर नावाचा इसम राहत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे कागदपत्रांची छाननी केली असता ॲग्रीमेंट फॉर सेल हे बनावट असल्याचे दिसून आले.

त्यामुळे तक्रारदार तक्रारदार यांचे कंपनीची रु.६६,०५१/- ची फसवणुक झाल्याने मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र.६१४/२२, कलम ४१७,४१८,४२०,४६५,४६७,४६८,४६९, ४७०, ४७१,४७४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्हयांचे तपासात मोहित वालेकर हे राहत असलेला फ्लॅट नं. ९०१, माऊली कृपा, सेक्टर १८, प्लॉट नं.३४, खारघर, पनवेल, जि.रायगड ४१०२१० हा सुमारे दोन वर्षापुर्वी सचिन बिल्लूर व श्रीमती रुपाली बिल्लूर यांनी विकला असल्याचे आढळुन आले होते. त्यामुळे तांत्रीक व कागदोपत्री माहिती व साक्षीदाराचे जबाबाचे आधारे बनावट

कागदपत्रांवरील फोटो हा सचिन बिल्लूर यांचा असल्याचे तपासात निषन्न झाल्याने त्यांस सदर गुन्हयांत दिनांक २३/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली असुन दिनांक ०४/११/२०२३ पर्यत पोलीस कोठडी मिळाली आहे. पोलीस कोठडी दरम्यान बनावट कागदपत्रांचे आधारे आणखी इतर फायनान्स कंपन्या व बॅकांना फसविल्याचे निषन्न झाले असुन त्यांचेकडुन आज पर्यत गुन्हयांतील दुचाकी वाहनासह १६ दुचाकी स्कुटर व ०७ विविध कंपनीच्या कार असे एकुण २३ वाहने अंदाजे किंमत ८९,०२,०००/- (एकोन्नवद लाख दोन हजार रूपये ) मुद्देमाल जप्त केले आहेत.त्यातील काही वाहनाची बॉडी बदलली असुन काही वाहनाचे क्रमांक देखील बनावट टाकले आहेत.

**<u>अटक आरोपीताचा नाव व पत्ता :-</u>**

श्री.सचिन मल्लीकार्जुन बिल्लुर, वय-४८ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा.ठी.सेक्टर-५, एम.आय.टी.आर.हॉस्पीटल जवळ, इडन गार्डन बिल्डींग समोर, खारघर, नवी मुंबई,

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का.व सू), मुंबई, श्री. सत्य नारायन चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई. श्री.अभिनव देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त (परिमंडळ -१), श्री. प्रविण मुंढे, मा. सहायक पोलीस आयुक्त ,कुलाबा विभाग, काशिद शशिकीरण, व.पो. नि.मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे,मुंबई, श्री.निलेश बागुल, पो.नि.गोंडुराम बांगल(गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि.राकेश शिंदे, पो.शि.क्र.०९०५०३/सतिश सांगळे, पो.शि.क्र.०९१९८२/नंदु कराटे, पो.शि.क्र. ११०७१६/रामेश्वर लोंढे, पो.शि.क्र.१४०१६३/कृष्णा सांगळे यांनी केली आहे.